जा.क्र.विशा/राजकीय/ २५४ /२०२०
विशेष शाखा, पिंपरी चिंचवड
दिनांक :-११/०१/२०२१

विषय :- **फौजदारी दंड प्रक्रिया संहिता (सी.आर.पी.सी.) १९७३ चे कलम १४४ प्रमाणे आदेश**

**आदेश,**

ज्याअर्थी, ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक - २०२० चे मतदान दिनांक १५/०१/२०२१ रोजी होणार असून दिनांक १८/०१/२०२१ रोजी मावळ तालुक्यातील ५७ ग्रामपंचायतींची मतमोजणी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील विश्वासराव भेगडे क्रिडा संकुल, तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे येथे होणार आहे. सदर मतमोजणी प्रक्रिया सुरळीतपणे व शांततेत पार पडण्यासाठी, कायदा व सुव्यवस्था राखणेकामी, सार्वजनिक मालमत्तेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने, सार्वजनिक उपद्रव टाळण्यासाठी विश्वासराव भेगडे क्रिडा संकुल, तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे या मतमोजणी केंद्राचे २०० मीटर परिसरात निर्बंध घालणे जरूरीचे आहे, अशी माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी मी कृष्ण प्रकाश, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय मला फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम १४४ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार **विश्वासराव भेगडे क्रिडा संकुल, तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे** या मतमोजणी केंद्राचे २०० मीटर परिसरात दिनांक १८/०१/२०२१ रोजीचे ००.०१ वा. पासून ते मतमोजणी प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत खालील प्रमाणे निर्बंध आदेश देत आहे.

१) मतमोजणी केंद्र परिसरात कोणत्याही प्रकारचे अधिकृत-अनधिकृत हत्यारे तसेच परवाना असलेली कोणत्याही प्रकारची अग्निशस्त्र घेवून फिरणेस या आदेशान्वये मनाई करीत आहे.
सदरचा आदेश कायदेशीर कर्तव्य बजावित असलेल्या शासकिय कर्मचाऱ्यांना (पोलीस दल,संरक्षण दल,तुरूंग विभाग, बँक सुरक्षा विभाग व इतर केंद्रीय तसेच राज्य शासनाचे अधिकारी व कर्मचारी) यांना लागू राहणार नाही.

२) मतमोजणी केंद्र परिसरात मोबाईल, कॉडलेस फोन, टॅब, लॅपटॉप वापरण्यास अगर घेवून येण्यास मनाई करण्यात येत आहे. (कर्तव्यावर असणाऱ्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना हा आदेश लागु राहणार नाही.)

३) मतमोजणी केंद्र परिसरात खाजगी इसमांना ध्वनीक्षेपकाचा वापर करण्यास मनाई करण्यात येत आहे.

४) मतमोजणी केंद्र परिसरात कोणताही मजकूर लिहिण्यास अगर छापील मजकूर प्रदर्शित करण्यास मनाई करण्यात येत आहे.

५) मतमोजणी केंद्र परिसरात शासकीय वाहने तसेच ज्यांना निवडणूक आयोगाने परवानगी दिली आहे अशी वाहने, विविध राजकीय पक्षांचे मतमोजणी प्रतिनीधींची वाहने इ.वाहने सोडून कोणत्याही प्रकारचे वाहन आत नेण्यास मनाई करण्यात येत आहे.

६) मतमोजणी केंद्र परिसरात अधिकृत पास शिवाय प्रवेश करण्यास मनाई करण्यात येत आहे.

७) मतमोजणीचा निकाल जाहिर झाल्यानंतर दिनांक १८/०१/२०२१ रोजी विजयी मिरवणूका काढण्यास सक्त मनाई करण्यात येत आहे.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भा.दं.वि. कलम १८८ अन्वये शिक्षेस पात्र राहील.
सदरचा आदेश माझे सही शिक्क्यानिशी आज दिनांक ११/०१/२०२१ रोजी दिला आहे.

पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड

(कृष्ण प्रकाश)
पोलीस आयुक्त,
पिंपरी चिंचवड.

ठिकाण :- पिंपरी चिंचवड
दिनांक :-११/०१/२०२१